कालपर्यंत छोट्या निर्मात्यांचा देवता समजला जाणारा मिथुन चक्रवर्तीचा *आग ही आग* व *कहानी किस्मत की* चित्रपट वितरकांनी नाकारल्यामुळे काही निर्मात्यांनी मिथुनच्याच माथी खापर फोडले. मात्र मिथुनचे चित्रपट बनण्याचे आणि प्रदर्शित होण्याचे काही थांबले नाहीत. निर्माते आलोक श्रीवास्तव व टी. एल. व्ही. प्रसाद यांचा *फूल और आग* प्रदर्शित व्हायच्या बेतात आहे. अशा परिस्थितीत मिथुनच्या चित्रपटाला हात लावायला कुणी वितरक तयार नाहीत अशी अफवा उठली. यात किती तथ्य आहे? *फूल और आग*ची कथा नेमकी काय आहे? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे निर्माते, दिग्दर्शक, अभिनेता जॅकी श्रॉफ व खुद्द मिथुन चक्रवर्ती यांच्याच शब्दात.....

□ राजेश श्रीवास्तव


माझा चित्रपट सामान्यांसाठीच आहे! - निर्माते आलोक श्रीवास्तव



जाहिरात क्षेत्रातून सिनेसृष्टीत पदार्पण करणाऱ्या निर्माते आलोक श्रीवास्तव यांनी *फसाना* मालिकेच्या एकशे चार भागांची निर्मिती केलीय. ते म्हणतात, "दोन महिन्यांपूर्वी तयार झालेला हा चित्रपट मी दहा महिन्यात पूर्ण केला. चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत सध्या मिथुनचे मार्केट थंड असल्याने दोनेक महिन्यानंतर चित्रपट प्रदर्शित करावा असे काहींचे मत होते. वितरकांना माझा चित्रपट आवडला आणि माझ्या सगळ्या टेरिटरी विकल्या मग मी का चित्रपट प्रदर्शित करायला विलंब करू? माझा चित्रपट प्रेक्षकांना आवडला तर ते चित्रपट पाहायला अवश्य येतील." मिथुनदाच्या मार्केटशी याचा काय संबंध? असे विचारता ते म्हणाले, "यावर माझा अजिबात विश्वास नाही. मी माझ्या आगामी चित्रपटातही मिथुनदालाच घेणार आहे. पण विश्वचषक सामन्यामुळे बिग बजेटच्या निर्मात्यांनी जून महिन्यात चित्रपट प्रदर्शित करण्याचा निश्चय केलाय. अशात *फूल और आग* प्रदर्शित करण्याची जोखीम तर तुम्ही घेत नाही ना? तेव्हा आलोक म्हणतात, "वीस-तीस टक्के प्रेक्षक सोडले तर माझ्या प्रेक्षकांना तशी क्रिकेटमध्ये फारशी आवड नाही. कारण ज्या प्रेक्षकांसाठी हा चित्रपट बनवला गेलाय तो अगदी सामान्य प्रेक्षक आहे त्याला प्रत्येक आठवड्यात नवीन चित्रपट पाहण्याची सवय आहे. मग क्रिकेट असो वा इतर कुठलाही खेळ असो, खेळाने त्यांना समाधान मिळत नाही. मी माझ्या चित्रपटाच्या यशाबद्दल खूपच आशावादी आहे.

माझा मिथुनवर विश्वास आहे! - दिग्दर्शक टी. एल. व्ही. प्रसाद

टी. एल. व्ही प्रसाद बॉलीवूडचे एकमेव असे दिग्दर्शक आहेत. ज्यांनी मिथुनला घेऊन आजवर सतरा चित्रपट दिग्दर्शित केलेत आणि त्याचे लक्ष्य शंभर चित्रपटांचे आहे. मिथुनच्या कारकीर्दीचा ढासळता आलेख पाहता पंचवीस चित्रपट तरी पूर्ण करू शकाल का? असे विचारता टी. एल. व्ही. प्रसाद म्हणाले, "आज असा कुठला अभिनेता आहे जो यशाची खात्री देऊ शकतो. अलिकडे मिथुन चक्रवर्ती विरुद्ध काही जणांनी एक मोहिम चालवली होती. मी कुणाचे नाव घेऊन विवादाचे मोहोळ उभे करत नाही. आजही मिथुनच्या निर्मात्यांचा मिथुनवर विश्वास आहे. पंचवीस चित्रपटाबद्दल म्हणाल तर आजवर सतरा चित्रपट प्रदर्शित झालेत. *विश्वनाथ, दादा, गंगा की कसम* व *फूल और आग* हे चार चित्रपट प्रदर्शित होऊ घातलेत आणि *आखरी प्रतिज्ञा, गंगाराम, फांदेबाज, कैदी* आणि तीन निनावी चित्रपट सेटवर आहेत. शंभर आकड्याचे लक्ष्य मी अवश्य पूर्ण करेन."



फूल और आग सूडाच्या भावनेवर आधारित संवेदनशील चित्रपट आहे. यात मिथुन चक्रवर्ती व जॅकी श्रॉफ यांचा संघर्ष आहे. अधिकाधिक प्रेक्षकांची संख्या वाढविण्यासाठी मी मिथुन चक्रवर्तीला एकसारख्याच भूमिकेत पेश करतो असे काहीजण म्हणतात हे साफ खोटे आहे. मिथुनबरोबर माझे लागोपाठ तीन चित्रपट प्रदर्शित व्हायच्या बेतात आहेत. पहिला *फूल और आग*मध्ये मिथुन देवाची भूमिका करतोय. *दादा*त एका प्रामाणिक, निष्ठावान हवालदाराची भूमिका करतोय. जो प्रेमासाठी गुन्हेगारीचा मार्ग अवलंबतो. *गंगा की कसम*मध्ये चोराची भूमिका करतोय. या तिन्ही चित्रपटात तीन वेगवेगळी पात्रे आहेत. अजून माझ्याजवळ डझनावारी कथा आहेत आणि या सगळ्या कथेत वेगवेगळी पात्रे आहेत. लवकरच मी नव्या चित्रपटाचे काम सुरू करतोय.